**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक प्रभू वाघमारे
मिरज नाक्याच्या पाठीमागे, रेल्वे सिग्नलजवळ, सांगोला, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवाजीनगर,
सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५९ / सोलापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक प्रभू वाघमारे
मिरज नाक्याच्या पाठीमागे, रेल्वे सिग्नलजवळ, सांगोला, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, सांगोला, ता.सांगोला, जि. सोलापूर श्री.जे.आर.अडसूळ

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,
शिवाजीनगर, सांगोला, ता.सांगोला, जि. सोलापूर श्रीमती सुनिता कृष्णा वाघमारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.११.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

शालेय पोषण आहाराच्या दोन वेळा दिलेल्या माहितीत तफावत आहे. भाजीपाल्याचे दर कमी असतात त्या काळात जास्त दाखविले आहेत व उन्हाळ्यात जास्त असतात तेथे कमी दाखविले आहेत. आपण माहिती मागत असल्याच्या रागापोटी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवाजीनगर, सांगोला, ता.सांगोला, जि. सोलापूर यांनी वर्गशिक्षक असताना आपल्या पाल्याला अनुत्तीर्ण केले. आपली पत्नी बालवाडी शिक्षिका असून भात शिजविण्याचे काम करीत होती. तेही काढून घेतले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.अशोक प्रभू वाघमारे यांनी केले.

अपीलकर्त्यास उपलब्ध असलेली सर्व माहिती विहित मुदतीत दिली. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती सागोला, जि.सोलापूर यांच्या आदेशानुसार पुन्हा माहिती दिली. आधी दिलेल्या माहितीत तांत्रिक नजरचूक झाली होती. ती दुरूस्त करून पुन्हा माहिती दिली. खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती दिली नाही. खिचडीचे कंत्राट ज्यांना दिले होते, त्यांनी अपीलकर्त्याच्या पत्नीला हंगामी स्वरूपात नेमले होते. त्यांच्या मुलाचा दाखला त्यांच्या मागणीवरून देण्यात आला. पुढील शैक्षणिक वर्षात पुन्हा त्यांच्या मागणीनुसार मुलाला शाळेत प्रवेश दिला. परंतु नियमानुसार त्याच वर्गात प्रवेश द्यावा लागला. त्यामुळे रागापोटी त्रास देण्याच्या

हेतूने ते विविध पातळ्यांवर अर्ज व तक्रारी करीत असतात. त्यांच्या तक्रारीच्या व वर्तमानपत्रात त्यांनी दिलेल्या बातम्यांच्या अनुषंगानेही चौकशी झाली असून तक्रारी निराधार असल्याचे निष्पन्न झाले आहे. शाळेत सर्व शिक्षिका असून अपीलकर्त्याचे वागणे व धमक्या यामुळे त्यांना मानसिक त्रास होत आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवाजीनगर, सांगोला, ता.सांगोला, जि.कोल्हापूर श्रीमती सुनिता कृष्णा वाघमारे यांनी केले.

माहितीतील चूक दुरूस्त करून माहिती देण्याचा आदेश आपण दिला. त्यानुसार नोंदपुस्तक छायांकित प्रतींसह माहिती देण्यात आली, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती सागोला, जि.सोलापूर श्री.जे.आर.अडसूळ यांनी केले.

अपीलकर्ता व संबंधित शाळांचे पदाधिकारी यांच्यातील वाद हा या प्रकरणातील मुख्य विषय असल्याचे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरून दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तो निर्णयार्थ येत नाही. अपीलकर्त्याच्या माहितीच्या अधिकाराच्या वापराबाबतीत जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेल्या तक्रारी गंभीर असून अपीलकर्त्यांने त्याची नोंद घेणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६.२.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. संभाजी जोतीराम दत्तू
मित्रनगर, ग्रामीण मंगळवेढा,
ता. मंगळवेढा, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य),**
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
महाराणी ताराबाई गर्ल्स हायस्कुल,
मंगळवेढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८१/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८/४/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९/६/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४/८/२००८ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** महाराणी ताराबाई गर्ल्स हायस्कुल मंगळवेढा च्या सन २००३-०४ ते सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षातील शालेय समितीच्या ठरावांच्या सत्यप्रती, सभासद यादी, समितीच्या ठरावांच्या सत्यप्रती इ. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ३/१/२००९ रोजी आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत या अपिलाचा समावेश होता.

आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे निवेदन अपीलकर्ता श्री. संभाजी जोतीराम दत्तू यांनी दि. २१/२/२०१० रोजी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. पांडुरंग आबा कांबळे
१०, रोशनी अपार्टमेंट,
बिबवेवाडी, पुणे

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरिक्षक,(मुख्यालय),**
नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरिक्षक,**
नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/२/२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरिक्षक,(मुख्यालय),**<br>नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे -१<br>श्री. सी.बी.भुरकुंडे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरिक्षक,**<br>नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे -१<br>श्री.अ.रा.देवगुंडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१/७/२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७/८/२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४/८/२००७ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. पांडुरंग आबा कांबळे हे मयत झाले असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १७/२/२०१० रोजी पूरक कागदपत्रांसह आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. संदिप रविंद्र काणे
३/५९२,झेंडा चौक, राजवाडा, गावभाग
इचलकरंजी, जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी,**
मुंबई गृहविकास व क्षेत्रविकास महामंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
मुंबई गृहविकास व क्षेत्रविकास महामंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२६/२०१०/ कोल्हापूर |
| ५ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -</u>**<br>उच्च उत्पन्न गटातील (HIG)लाभर्थ्यासाठी असलेल्या न्यू दिंडोशी, मालाड(पूर्व),मुंबई येथील सदनिकांची माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. संदिप रविंद्र काणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ,जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** 18 FEB 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. कृष्णात रामचंद्र शेळके (पाटील)
मु.शेळकेवाडी, पो.सोनगाव,
ता.जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणधिकारी (माध्य),**
जिल्हा परिषद, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
मुख्यध्यापक, माध्यमिक विद्यालय,
मु.शेळकेवाडी, पो.सोनगाव,
ता.जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१/२०१०/ सातारा |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग यांनी संस्थेला दिलेल्या प्रथम मान्यता पत्रातील सर्व सूचनांची अंमलबजावणी केली आहे का, याबाबतची कागदपत्रांसह माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. कृष्णात रामचंद्र शेळके (पाटील) यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व इ.कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे..

पुणे
दि. 18 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. जवाहरलाल आण्णासाहेब रोटे
६४४,ई वॉर्ड, १ ली गल्ली, शाहुपुरी
कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी**
भारत संचार निगम लिमिटेड
टेलिफोन भवन, ताराबाई पार्क,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
सहाय्यक महाप्रबंधक(प्रशासन), भारत संचार निगम लिमिटेड,
टेलिफोन भवन, ताराबाई पार्क,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३/२०१०/ कोल्हापूर |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०४.०१.२०१० |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>बी.एस.एन.एल.च्या दूरध्वनी डायरीसाठी पैसे भरून देखील अद्याप डायरी न मिळणेबाबत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. जवाहरलाल आण्णासाहेब रोटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांचे निर्णयाविरूध्द अपील केले आहे, ते सार्वजनिक प्राधिकरण हे केंद्रिय माहिती आयोगाच्या कार्य कक्षेतील असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 18 FEB 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कयामुद्दीन बाबुलाल शेख
मु.पो.माळेगाव बु., ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस आयुक्त, पुणे शहर,पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपायुक्त(मुख्यालय),
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कयामुद्दीन बाबुलाल शेख
मु.पो.माळेगाव बु., ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस आयुक्त, पुणे शहर,पुणे प्रतिनिधी श्री.ए.बी.रोकडे

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपायुक्त(मुख्यालय),
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे श्री.एस.आर.चौगाडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.११.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.१२.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.३.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.५.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२.२.२०१० रोजी घेण्यात आली.

सन १९९३-१९९४ मध्ये पोलीस दलात प्रशिक्षण देऊन अल्पावधीत आपल्याला सेवेतून निलंबित करण्यात आले. आपली बाजू ऐकून न घेता व अयोग्य पध्दतीने आपल्यावर कारवाई करून अन्याय केला, या संदर्भातील माहिती विलंबाने दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.कयामुद्दीन बाबुलाल शेख यांनी केली.

श्री.शेख यांनी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने संबंधित शासन निर्णयाची प्रत पुरविली. त्यांना सेवेतून कमी करण्यासंदर्भातील कारणांबाबत मतप्रदर्शन करणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसे त्यांना उत्तर दिले, असे जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे श्री.एस.आर.चौगाडे यांनी नमूद केले.

श्री.शेख यांचा अर्ज दि.२५.११.२००६ / दि.९.१२.२००६ चा असून दि.२०.१२.२००६ रोजी उत्तर देण्यात आले आहे, असे कागदपत्रांवरून स्पष्ट होते. माहिती देण्यात आली आहे. निलंबन योग्य की अयोग्य हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. बाळू हिराजी पालवे
अमोलिकसर निवास,
माळीवाडा, अहमदनगर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी कुलसचिव,**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड,
पुणे -७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड,
पुणे -७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३९/पुणे |
| २ | विशेष अपिल निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. २१/१०/२००८ |
| ३ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५/१०/२००७ |
| ४ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती :-** मे २००७ मध्ये झालेल्या एम.ए.(इंग्रजी) विषयाच्या आसन क्र. २६६५३ च्या सर्व उत्तर पत्रिकांचे मोफत पुनर्मुल्यांकन करुन मिळावे, तसेच सदर उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती गुण निकषांसह मिळाव्यात | |

**विवेचन**

दिनांक २१/१०/२००८ रोजीच्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा' मध्ये सदर अपीलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपिलकर्ता श्री. बाळू हिराजी पालवे हे गैरहजर होते. जन माहिती अधिकारी , पुणे विद्यापीठ यांनी आयोगास सादर केलेल्या निवेदनामध्ये

'विद्यापीठाने परिक्षेच्या फेरतपासणी, तसेच पुनर्मुल्यांकनासाठी विद्यापीठ अध्यादेश क्र. १३४ (ए) व (बी) अन्वये विहित करण्यात आलेल्या पध्दतीनुसार विद्यार्थ्याने फेरतपासणी व पुनर्मुल्यांकनासाठी परिक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून १० दिवसांच्या आत विहित नमुन्यात योग्य शुल्कासह विद्यापीठ कार्यालयात करणे आवश्यक आहे. तथापि अर्जदाराची मागणी ही फेरतपासणी व पुनर्मुल्यांकन प्रक्रिया मोफत करण्याची आहे. तसेच सदरची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ अन्वये 'माहिती' या व्याखेत येत नाही', असे नमूद केले आहे, ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 26 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक बबन मंडले
एरंडवणा, कर्वे रोड, ४३/९ब, पुणे-४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक बबन मंडले
एरंडवणा, कर्वे रोड, ४३/९ब, पुणे-४

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे तत्कालीन श्री.चिंतामणी जोशी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी, पुणे श्री.संजीव देशमुख

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१०.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१८.५.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.५.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ व २६.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२.२.२०१० रोजी घेण्यात आली.

लिपिक संवर्ग व तलाठी संवर्ग यामधून दिलेल्या पदोन्नतीच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती विलंबाने व अपूर्ण दिली. सर्व निकषांनुसार आपण पात्र ठरत असतानाही पदोन्नती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अशोक बबन मंडले यांनी केली.

श्री.मंडले यांनी पदोन्नतीच्या कार्यवाहीबाबत अभिप्रायाची अपेक्षा असलेले प्रश्न विचारले होते. दि.१६.१०.२००६ च्या त्यांच्या अर्जाला दि.२६.१०.२००६ रोजी उत्तर दिले. दि.१८.११.२००६ रोजी शुल्क भरण्याबाबत कळविले. ते स्वतः येऊन माहिती घेऊन गेले. संचिकांचे अवलोकन केल्यानंतर त्यांनी आणखी माहिती मागितली, तीही त्यांनी शुल्क भरल्यानंतर दि.१८.५.२००७ रोजी देण्यात आली. विशिष्ट तक्त्यांमध्येच माहिती संकलित करून देण्याची मागणी त्यांनी केली असून असे नमुने अर्जात जोडले आहेत. अशा स्वरूपाचे संकलन करून देणे शक्य नसल्यामुळे ज्येष्ठता यादी पुरविली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी, पुणे श्री.संजीव देशमुख यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५ .२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीधर लक्ष्मण तापकीर
चऱ्होली बु., चोवीसावाडी, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली,
ता.हवेली, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली,
ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७७/२६२३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्रीधर लक्ष्मण तापकीर
चऱ्होली बु., चोवीसावाडी, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली, ता.हवेली, जि.पुणे श्री.विजय पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली,
ता.हवेली, जि.पुणे श्री.ज.ह.निंबाळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.११.२००७, २४.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००७, १.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१२.२००७, ८.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.२.२००८ |
| ८ | माहिती मागणीच्या अर्जाची (मूळ अर्ज) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील चुकीच्या नोंदी दुरूस्त कराव्यात.(अपील क्र.१६२५) चोवीसावाडी येथील शिधापत्रिका आदींबाबत आपण मागणी केल्यानुसार कार्यवाही झालेली नाही (अपील क्र.१३७७), असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.श्रीधर लक्ष्मण तापकीर यांनी केले.

श्री.तापकीर यांनी ७/१२ वरील नोंदीच्या संदर्भात चुकीच्या नोंदी केल्याची तक्रार असून उपविभागीय अधिकाऱ्यांकडे महसूल नियमावलीअंतर्गत अपील केले. संबंधित नोंद सन १९६८-६९ सुमाराची असल्याचे दिसते. त्यामुळे पुनर्विलोकन अर्ज आवश्यक आहे, असे विहित मुदतीत त्याना दोनदा कळविले. चोवीसावाडी येथे तीन किरकोळ केरोसीन परवानाधारक असून त्याबाबत कोणत्या दुकानांची माहिती हवी आहे, हे कळविण्याबाबतचे पत्र एका आठवड्यात त्यांना पाठविले. किरकोळ केरोसीन विक्रीच्या पावत्यासह सर्व माहिती त्यांनी मागितली असून त्यांच्या उत्तरानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्यांना आवश्यक असल्यास तीनही दुकानांकडील माहिती देता येईल, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता.हवेली, जि.पुणे श्री.ज.ह.निंबाळकर यांनी सांगितले.

७/१२ उताऱ्यावरील नोंदीत दुरूस्ती करण्याची श्री.तापकीर यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. सन १९६७ पर्यंत अन्य नावाचा उताऱ्यावर समावेश नव्हता व त्यानंतर ही नावे लागली असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता.हवेली, जि.पुणे श्री.ज.ह.निंबाळकर यांनी तोंडी सांगितले. मात्र प्रकरण जुने असल्यामुळे श्री.तापकीर यांनी उपविभागीय अधिकारी , पुणे उपविभाग, पुणे यांच्याकडे दाद मागणे आवश्यक

असल्याचे कळविण्यात आले असून तसा अर्ज त्यांनी दाखल केला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली, ता.हवेली, जि.पुणे श्री.विजय पाटील यांनी नमूद केले.

केरोसीन विक्री आदींबाबतची चोवीसावाडी येथील तीनही दुकानांकडील माहिती माहिती अपीलकर्त्यास त्वरित देण्यात यावी, असे मौखिक आदेश आयोगाने दिले.

७/१२ उताऱ्यावरील नोंदी दुरूस्त करणे हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही. त्यासाठी जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता.हवेली, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली, ता.हवेली, जि.पुणे यांनी केलेल्या सूचनेनुसार आवश्यक तर अपीलकर्त्यांनी उचित अधिकाऱ्यांकडे दाद मागावी याची समज अपीलकर्त्यास देण्यात आली. त्यानुसार आपण उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यांच्याकडे दि.२५.५.२००९ रोजी अपील दाखल केले, मात्र त्यावरील आदेश अद्याप झाले नसल्याचे श्री.तापकीर यांनी दि.१३.१०.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. संबंधित पक्रिया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. मात्र या विषयात केलेल्या कार्यवाहीची माहिती उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यांनी अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे.

## आदेश

(१) अपील क्रमांक १३७७ अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) अपील क्रमांक १६२३ अमान्य करण्यात येत आहे.

(३) ७/१२ उताऱ्यावरील नोंदींच्या संदर्भात श्री.श्रीधर लक्ष्मण तापकीर यांनी महसूल नियमवालीअंतर्गत केलेल्या अपिलावरील कार्यवाहीच्या सद्यस्थितीची माहिती उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यांनी दि.५.३.२०१० पर्यंत अपीलकर्त्यास पुरवावी व त्याचा अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि.२६.२.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

असल्याचे कळविण्यात आले असून तसा अर्ज त्यांनी दाखल केला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली, ता.हवेली, जि.पुणे श्री.विजय पाटील यांनी नमूद केले.

केरोसीन विक्री आर्दीबाबतची चोवीसावाडी येथील तीनही दुकानांकडील माहिती माहिती अपीलकर्त्यास त्वरित देण्यात यावी, असे मौखिक आदेश आयोगाने दिले.

७/१२ उताऱ्यावरील नोंदी दुरूस्त करणे हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही. त्यासाठी जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता.हवेली, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली, ता.हवेली, जि.पुणे यांनी केलेल्या सूचनेनुसार आवश्यक तर अपीलकर्त्यांनी उचित अधिकाऱ्यांकडे दाद मागावी याची समज अपीलकर्त्यास देण्यात आली. त्यानुसार आपण उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यांच्याकडे दि.२५.५.२००९ रोजी अपील दाखल केले, मात्र त्यावरील आदेश अद्याप झाले नसल्याचे श्री.तापकीर यांनी दि.१३.१०.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. संबंधित पक्रिया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. मात्र या विषयात केलेल्या कार्यवाहीची माहिती उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यांनी अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे.

**आदेश**

(१) अपील क्रमांक १३७७ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपील क्रमांक १६२३ अमान्य करण्यात येत आहे.

(३) ७/१२ उताऱ्यावरील नोंदींच्या संदर्भात श्री.श्रीधर लक्ष्मण तापकीर यांनी महसूल नियमवालीअंतर्गत केलेल्या अपिलावरील कार्यवाहीच्या सद्यस्थितीची माहिती उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यांनी दि.५.३.२०१० पर्यंत अपीलकर्त्यास पुरवावी व त्याचा अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि.२६.२.२०१०**

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११ ००१

श्री. शंकर यशवंत फडतरे
मु.केंजळ, पो. कवठे, ता.कराड,
जि. सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार** **उत्तरवादी**
कराड, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३/२०१०/ सातारा |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** स.नं. १०६५ हिस्सा नं ८ चे ७/१२ उतारे व त्यावरील फेरफार, खाते उतारे इ. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. शंकर यशवंत फडतरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २०.०२.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सतिश नरसू मोरे
सिध्दार्थ नगर, पेठ वडगाव,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपरिषद, वडगाव,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
बांधकाम विभाग,
वडगाव नगर परिषद, वडगाव,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६/२०१०/ कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.०९.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.१०.२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०१.०१.२०१० |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यायामशाळेबाबत दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सतिश नरसू मोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ.कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 18 FEB 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. दत्तात्रय आंतू पाटील
मु.मळगे खुर्द,पो.बानगे
ता.कागल, जि.कोल्हापूर — **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी,**
भूमी अभिलेख कार्यालय,कोल्हापूर, — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
भूमी अभिलेख कार्यालय,कोल्हापूर,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७/२०१०/ कोल्हापूर |
| ५ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>मौजे मळगे खुर्द येथील गट नं.६५ च्या मोजणीमध्ये चूकीची हद्द दाखविल्यामुळे नव्याने मोजणी करणे संदर्भातील माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय आंतू पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणेः-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे..

**पुणे**
**दि.** 18 FEB 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सुरेश संभाजी खुडे
संकल्पनगरी, सी-२,
धानोरी, लोहगांव रस्ता,
पुणे -१५ **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु,** **उत्तरवादी**
भारती विद्यापीठ, शास्त्री रस्ता,
पुणे -४

**जन माहिती अधिकारी,**
भारती विद्यापीठ, शास्त्री रस्ता,
पुणे -४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१९/पुणे |
| | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१/८/२००७ |
| | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३/९/२००७ |
| | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३/१०/२००७ |
| | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र 'अ ') छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

दि. २१/१०/२००८ रोजीच्या ' विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा ' मध्ये सदर अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता श्री. सुरेश खुडे हे गैरहजर होते, तर जन माहिती अधिकारी भारती विद्यापीठ हे उपस्थित होते, 'आपण मागणी केलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची असून भारती विद्यापीठाअंतर्गत

निश्चित कोणत्या संस्थेविषयी माहिती आवश्यक आहे, हे कळविल्यास योग्य ती माहिती देणे शक्य होईल', असे अपिलकर्त्यास विहित मुदतीत कळविले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले आहे. अपिलकर्त्याने आवश्यक तर त्यानुसार कार्यवाही करावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शहाजी रामदास भगत
कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर
कारखाना लि.सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर),
पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर
कारखाना लि.सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५२ / पुणे /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शहाजी रामदास भगत
कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर
कारखाना लि., सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर),
पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.बी.जे.देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर
कारखाना लि., सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे श्री.शहाजी रामदास भगत

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.५.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.११.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.१२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांपैकी कोणीही हजर न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली.

अर्जदार श्री.सचिन जनार्दन काकडे यांनी मागितलेली माहिती विस्तृत होती. आपण दारिद्र्यरेषेखाली असल्याचे त्यांनी अर्जात नमूद केले असले, तरी छायाचित्रासह अधिकृत पुरावा जोडला नव्हता. त्यामुळे असा पुरावा देण्याची मागणी करूनही त्यांनी पूर्तता केली नाही. त्याविरूध्द त्यांनी केलेले अपील, अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी मान्य केले व १५ दिवसांत माहिती नि:शुल्क देण्याचा आदेश दिला. माहिती संकलित करण्यास वेळ लागणार असल्याचे श्री.काकडे याना कळविले होते, तसेच ते दारिद्र्यरेषेखाली असल्याच्या अधिकृत प्रमाणपत्राची मागणी केली होती. माहिती नाकारलेली नव्हती. तरीही या बाबी लक्षात न घेता अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश दिला असून तो रद्द व्हावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शहाजी रामदास भगत यांनी केली. सुमारे १२०० पानांची माहिती असून मूळ अर्जदाराने छायाचित्रासह दारिद्र्यरेषेखालील योग्य प्रमाणपत्र दाखल केल्यास ती नि:शुल्क देण्यात येईल, असे प्रतिपादन श्री.शहाजी रामदास भगत यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याचे प्रतिपादन रास्त आहे. मूळ अर्जदाराने त्यानुसार पूर्तता करणे आवश्यक आहे, याची दखल अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक

सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी घेणे आवश्यक होते. तशी ती घेतलेली नसल्यामुळे त्यांचा निर्णय अयोग्य ठरतो.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) माहिती - मागणीच्या मूळ प्रकरणात अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी दि.१७.१२.२००७ रोजी दिलेला निर्णय रद्द करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२६.२.२०१०